# २) लोहस्स परिणामो

बाराव्या शतकात होऊन गेलेल्या सोमप्रभाचार्यांनी 'कुमारपालप्रतिबोध' नावाचा ग्रंथ लिहिला. सोमप्रभसूरींनी सामाजिक, नैतिक आणि धार्मिक आचाराविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी 'कुमारपालप्रतिबोध' या कथा-ग्रंथाची रचना केली. सोमप्रभसूरी यांचा जन्म प्राग्वाट कुळातील वैश्य परिवारामध्ये झाला. हे संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश प्राकृतचे प्रकांड पंडित होते. आचार्य हेमचंद्र यांच्या उपदेशाने प्रभावित होऊन चालुक्यवंशी राजा कुमारपाल याने जैन धर्माचा स्वीकार केला होता. कुमारपालाच्या मृत्यूनंतर अकरा वर्षांनी 'कुमारपालप्रतिबोध' या कथाग्रंथाची रचना करण्यात आली. या ग्रंथामध्ये एकूण ५ अध्याय (प्रस्ताव) असून त्यामध्ये ५६ कथा आहेत.

या उताऱ्यात सागर व्यापाऱ्याची कथा आली असून द्रव्याच्या लोभामुळे त्याच्यावर, एकामागून एक संकटे कशी कोसळतात त्याचे सुंदर वर्णन आलेले आहे.

अत्थि भरहम्मि णयरी मिहिला, रमणीया मणहरागारा।
पायारेण वरेणं परियरिया, जा परागम्मा।।१।।

वेसमण-समाण-धणो, तत्थ वणी अत्थि साअरो णाम।
अत्थं चिय पुरिसत्थं, मण्णइ सो लोभ-गह-गहिओ।।२।।

करिसण-हट्ट-कलंतर,-वणिज्ज-पमुहे धणज्जणोवाए।
विविहे सो कुणइ सया, अगणंतो अप्पणो दुक्खं।।३।।

कइया वि तेण दिट्ठो, जोगप्पो जोगिओ गरुय-गव्वो।
तत्तो 'का तुह सत्ति?' त्ति, पुच्छिओ दंसिओ जोई।।४।।

तो साअरेण वुत्तो 'जोगिंद, ण मे पओयणं किं पि।
गह-गिरि-पमुहेहिं, पाडिएहिं उप्पाडिएहिं वा।।५।।



जइ अत्थि कणय-सिद्धी, ता तं दंसेसु मे, किमण्णेण?'।
तो जोगिएण भणियं, 'कणगं आणेसु किंचि तुमं।।६।।

तं झत्ति जेण दुगुणं करेमि', तो साअरेण आणीअं।
कणअस्स करिसमेक्कं, कवडेण तमग्गिणा धमिअं।।७।।

खिविऊण णिअय-कणयं, छण्णं तं जोगिणा कअं दुगुणं।
तो कुणइ विम्हिओ, तस्स आयरं सागरो गरुअं।।८।।

जोगी भणइ किलेसेण, 'इत्तिएणेव होइ बहुयं पि'।
तो कणग-पल-सयं, सागरेण जोगिस्स उवणीयं।।९।।

तं सयल-णिसं दोहि वि, धमियं जलणेण तो चरमजामे।
सुत्तम्मि सायरे गिण्हिऊण, तं जोगिओ णट्ठो।।१०।।

'हा! मुट्ठो' त्ति विसण्णो, कयाऽवि केणाऽवि सागरो भणिओ।
'देसंतर-वाणिज्जे कीरंतं, होइ धण-लाहो'।।११।।

काऊण महा-सत्थं, गहिऊण कयाणआइं विविहाइं।
लंघिय-विसम-अरण्णो, सो पत्तो तामलित्तिपुरिं।।१२।।

कअ-विक्कए कुणंतस्स, तस्स जाओ तहिं बहुअं लाहो।
सो तहऽवि असंतुट्ठो, समुद्दमवगाहिउं महइ।।१३।।

तेण गहियं पवहणं, कट्ठमअं अप्पणो चरित्तं व।
चित्तं ण जत्थ थेवो वि, विलसए लोह-संबंधो।।१४।।

दीवंतर-जुग्गाइं किणियाइं, कयाणगाइं विविहाइं।
कण-घय-तिल्ल-जलिंधण,-पमुहाणं संगहो विहिओ।।१५।।

अह पिल्लियं पवहणं, वज्जंताउज्ज-रव-भरिय-भुवणं।
तत्थ कय-मंगलो, परियणेण सह सागरो चडिओ।।१६।।



मउम्मत्तो व्व विसंठुल,-पयप्पयारो महोयही जाओ।
फुट्टं तओ पवहणं, पडियं उद्दाउ भंडं च।।१७।।

अह साअरेण लद्धं फलयं, पिय-माणुसं व हियएण।
घित्तूण तं समुद्दे सो, भमिओ सत्त-दियहाइं।।१८।।

पत्तो कहं पि तीरे सो, दिट्ठो णिद्दएहिं मिच्छेहिं।
पावंति लोह-विवसा जं, वसणुत्तिरिविडिं जीवा।।१९।।

## सद्दत्था

**मिहिला** – मिथिला (नगरी)
**मणहरागारा** – सुंदर आकार असणारी
**पायारेण** – प्राकाराने, तटबंदीने
**वरेणं** – श्रेष्ठ (मजबूत)
**परियरिया** – वेढलेली (होती)
**परागम्मा** – (जिच्या) पलिकडे जाण्यास अवघड, शत्रूंना दुर्जय
**वेसमणसमाणधणो** – कुबेराप्रमाणे धनी/श्रीमंत असणारा
**वणी** – व्यापारी
**लोभगहगहिओ** – लोभरूपी ग्रहाने (पिशाच्चाने) पछाडलेला
**करिसणहट्टकलंतरवणिज्जपमुहे** – शेती, दुकान, (व्याजावर) पैसे देणे, व्यापार यांच्यामध्ये प्रमुख
**धणज्जणोवाए** – पैसा मिळविण्याचे उपाय
**अगणंतो** – पर्वा न करता
**जोगप्पो** – योगात्मा, योगी
**गरुयगव्वो** – मोठा गर्व/अभिमान असणारा, अत्यंत गर्विष्ठ, अभिमानी
**सत्ति** – सामर्थ्य, शक्ती
**कणयसिद्धी** – सोन्याची प्राप्ती
**दुगुणं** – दुप्पट
**करिसमेक्कं** – एक पल, (कोणत्याही) वजनाचा चौथा हिस्सा
**कवडेण** – कपटाने
**धमिअं/धमियं** – तापवले
**खिविऊण** – टाकून
**छण्णं** – कपट, माया
**विम्हिओ** – आश्चर्यचकित झालेला
**किलेसेण** – क्लेशाने, कष्टाने
**उवणीयं** – जवळ ठेवले, जवळ आणले
**सयलं णिसं** – संपूर्ण रात्र
**चरमजामे** – शेवटच्या प्रहरी
**मुट्ठो** – (मी) लुटला गेलो
**महासत्थं** – मोठा तांडा/समूह
**कयाणआइं/कयाणगाइं** – विकण्याचे सामान
**लंघियविसमअरण्णो** – भयंकर अरण्य ओलांडून
**महइ** – इच्छा करतो
**पवहणं** – नौका/यान
**कट्ठमअं** – लाकडाची, लाकडी
**थेवो** – अल्प, थोडे
**किणियाइं** – खरेदीचे सामान
**पिल्लियं** – (नौका) ढकलली/हाकारली
**वज्जंताउज्जरवभरियभुवणं** – वाजत असलेल्या वाद्यांच्या निनादाने जग भरून गेले असता
**विसंठुलपयप्पयारो** – झोकांड्या देत पावले टाकणारा
**उद्दाउ** – उद्र नावाच्या प्राण्याच्या कातड्यापासून बनविलेली थैली
**णिद्दएहिं** – निष्ठुरांकडून
**मिच्छेहिं** – म्लेच्छांकडून (एक प्रकारची जात)
**लोहविवसा**– लोभाच्या आधीन झालेले
**वसणुत्तिरिविडिं** – संकटांची उतरंड

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) अत्थि भरहम्मि ...... लोभ-गह-गहिओ।।
२) तो साअरेण ...... आणेसु किंचि तुमं।।
३) जोगी भणइ ...... तं जोगिओ णट्ठो।।
४) अह सागरेण ...... वसणुत्तिरिविडिं जीवा।।

**२) प्राकृतमध्ये उत्तरे द्या.**

१) का णयरी रमणीया अत्थि ?
२) सागरो कस्सिं समाणो अत्थि ?
३) जोगिएण सागरो किं आणिउं कहिओ ?
४) कणयं केण साहेज्जेण धमियं ?
५) महोयही केण समो जाओ ?
६) सायरो समुद्दे कइवय-दिअहाइं भमिओ ?

**३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ताम्रलिप्ती नगरीला जाताना सागर स्वत:बरोबर घेऊन गेलेल्या वस्तूंची नावे लिहा?
२) सागर व्यापाऱ्यावर लोभाचा झालेला परिणाम सांगा ?
३) सागर व्यापाऱ्याला योगी-महाराजांकडून काय हवे होते?

**४) सविस्तर उत्तरे द्या.**

१) मिथिला नगरीचे वर्णन करा.
२) योग्याने सागर व्यापाऱ्याला कसे फसविले ?
३) खवळलेल्या समुद्राचे वर्णन कवीने कसे केले आहे?
४) 'लोहस्स परिणामो' या काव्याचे विवेचक रसग्रहण करा.

**५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) अत्थं चिय पुरिसत्थं मण्णइ सो लोभ-गह-गहिओ।
२) तत्तो 'का तुह सत्ति ?' त्ति पुच्छिओ जंपिओ जोई।
३) जइ अत्थि कणय-सिद्धी ता तं दंसेसु मे किमण्णेण?।
४) 'हा! मुट्ठो' त्ति विसण्णो कयाऽवि केणाऽवि सागरो भणिओ।

**६) समास ओळखून विग्रह करा.**

१) धणज्जणोवाओ -
२) कणघयतिल्लजलिंधणाणं-
३) पियमाणुसं -
४) मणहरागारा -
५) पवणुप्पाडिओ -
६) कयंतमहिसो-

**७) अ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | विभक्ती | लिंग | वचन | शब्दार्थ |
|---|---|---|---|---|
| भरहम्मि | | | | |
| रमणीया | | | | |
| रत्तीए | | | | |
| पायारेण | | | | |
| जोगिणा | | | | |
| भूमियले | | | | |
| सागरो | | | | |
| किलेसेण | | | | |
| कणयस्स | | | | |
| अहं | | | | |
| पवहणं | | | | |

**७) ब) धातूंची तक्त्यात सांगितलेली रूपे द्या.**

| धातू | कर्म.भू. धा.वि. | वर्त. विशेषण | विध्यर्थ. तृ.पु.ए.व. | भविष्यकाळ द्वि.पु.ए.व. |
|---|---|---|---|---|
| भम | | | | |
| पाव | | | | |
| कर | | | | |
| उव+णी | | | | |
| विलस | | | | |
| गिण्ह | | | | |
| मह | | | | |
| पुच्छ | | | | |
| खिव | | | | |
| तर | | | | |